प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com



क्विक हिल फाउंडेशनच्या प्रशिक्षणात सहभागी आळे येथील बाळासाहेब जाधव महाविद्यालयाचे विद्यार्थी.

# जाधव महाविद्यालयाचे सायबर सुरक्षा अभियानात यश

## बीसीए व बीएस्सीच्या ४ विद्यार्थ्यांची निवड

**आळेफाटा : पुढारी वृत्तसेवा**

आळे (ता. जुन्नर) येथील बाळासाहेब जाधव महाविद्यालयाच्या बीसीए व बीएस्सी(संगणक शास्त्र) विभागातील चार विद्यार्थ्यांची क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अभियानासाठी क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव व विभागप्रमुख नूतन जोशी यांनी दिली.

आळे महाविद्यालयात संगणकशास्त्र विभाग व क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने मागील शैक्षणिक वर्षात सामंजस्य करार करण्यात आला. या अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी शाळा, महाविद्यालये, महिला बचत गट व बसस्थानके येथे ओटीपी, कर्ज, बँकेतील व्यवहारांमध्ये होणाऱ्या फसवणुकीची माहिती देत कोणती काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. या अंतर्गत अक्षदा हाडवळे, मिसबाह इनामदार, वरद वाघ, रोहन टाकळकर या विद्यार्थ्यांची सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या अभियानासाठी क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली. अजय शिर्के, सुगंधा दाणी, गायत्री पवार, अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

निवड झालेले विद्यार्थी सायबर सिक्युरिटीबद्दल विद्यार्थ्यांना व सामाजिक घटकांना मार्गदर्शन करून त्यांच्यात जागरूकता निर्माण करण्याचे काम करणार आहेत.

विभागप्रमुख प्रा. नूतन जोशी यांची या अभियानासाठी शिक्षक समन्वयक म्हणून निवड करण्यात आली. ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळ अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, उपाध्यक्ष सौरभ डोके, सचिव अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे, संचालक किशोर कुऱ्हाडे, भाऊ कुऱ्हाडे, बबन सहाणे, उल्हास सहाणे, बाबु कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, जीवन शिंदे यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.